Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026


ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XIV | Issue - II
February - July 2026
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2026 - 8.246
(www.sjifactor.com)



Ajanta Prakashan

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY

HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XIV | Issue - II | February - July 2026

MARATHI PART - I

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

Impact Factor / Indexing
2025 - 8.077
www.sjifactor.com

EDITOR

Dr. Vinay Shankarrao Hatole

Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

PUBLISHED BY

AJANTA PRAKASHAN

Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"GENIUS"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad), also Published the same at Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad)

**Printed by**

Ajanta Computer,
Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra, India

**Published by**

**Ajanta Prakashan,**
Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra, India
Cell No. : 9579260877, 9822620877
E-mail : ajanta2026@gmail.com, www.ajantaprakashan.in

**GENIUS - ISSN 2279 - 0489 - Impact Factor - 8.077** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अनु.क्र. | लेख आणि लेखकचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत साहित्य आणि शाश्वत जीवनमूल्ये<br>**प्रा. संतोष बोंगाळे** | १-७ |
| २ | प्राचीन आर्थिक विचार हे राष्ट्राच्या उभारणीत व सरकारची भूमिका ठरविण्यासाठी गरजेचे<br>**प्रा. दत्तात्रय आण्णा होनमाने** | ८-१४ |
| ३ | भारतीय शाश्वत विकासामध्ये महात्मा गांधी यांचे योगदान<br>**प्रा. दिलीप आण्णा पवार** | १५-१७ |
| ४ | शाश्वत रचनेची आदर्श प्रतिकृती: किल्ले<br>**प्रा. सुधाकर वाल्मिक पवार** | १८-२२ |
| ५ | भारतीय भाषांचे संरक्षण शाश्वत विकासासाठी गुरुकिल्ली<br>**डॉ. संभाजी आण्णू शिंदे** | २३-३१ |
| ६ | प्राचीन भारतीय समाजातील वर्णव्यवस्था : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**अर्चना कमलाकर कांबळे** | ३२-३७ |
| ७ | प्राचीन भारतीय अर्थतज्ञ कौटिल्य यांचे आर्थिक विचार :एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ. आत्माराम मुळीक** | ३८-४७ |
| ८ | लोकपरंपरा, उत्सव आणि पर्यावरणीय मूल्यांचे जतन<br>**दिपाली शंकर वाघमारे** | ४८-५४ |
| ९ | शाश्वत भारतासाठी महिला कामगारांच्या स्वास्थ्याच्या संबंधित अध्ययन<br>**कु. दिप्ती म. ब्राम्हणकर**<br>**डॉ. गोकुला भालेराव** | ५५-६१ |
| १० | मराठी साहित्यातील शाश्वत पर्यावरणीय विचार<br>**कु. दिपाली अशोक टाकसाळकर** | ६२-६६ |
| ११ | वारकरी संप्रदायातील तत्त्वज्ञान<br>**डॉ. दीपक शंकरराव जाधव** | ६७-७० |
| १२ | संत साहित्यातील शाश्वत जीवनमूल्ये<br>**डॉ. अनिता आंबोकर** | ७१-७५ |
| १३ | भारतीय ज्ञानप्रणालीचे शाश्वत विपणन विकासातील योगदान<br>**डॉ. आशा विनोद सावंत** | ७६-८१ |
| १४ | संतांच्या मूल्य विचारांची उपयुक्तता<br>**डॉ. अशोक सदाशिव तवर** | ८२-८६ |

VOLUME - XIV, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2026
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 8.077 (www.sjifactor.com) 

# १३. भारतीय ज्ञानप्रणालीचे शाश्वत विपणन विकासातील योगदान

**डॉ. आशा विनोद सावंत**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड.

**सारांश (Abstract)**

जागतिकीकरण, तंत्रज्ञानाची झपाट्याने होणारी वाढ, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक असमानता यामुळे आजच्या व्यवसाय व्यवस्थापनात शाश्वततेचा विचार अनिवार्य ठरला आहे. शाश्वत विपणन (Sustainable Marketing) हे केवळ उत्पादन विक्रीचे तंत्र नसून पर्यावरणाचे संवर्धन, सामाजिक न्याय आणि आर्थिकं स्थैर्य यांचा समतोल राखणारी व्यापक प्रक्रिया आहे. भारतीय ज्ञानप्रणाली ही हजारो वर्षांच्या तत्त्वज्ञानवर, नैतिकतेवर आणि पर्यावरणस्नेही परंपरेवर अवलंबून आहे. धर्म, अहिंसा, समत्व, संयम, लोककल्याण, वसुधैव कुटुंबकम् यांसारख्या मूल्यांवर आधारित ही प्रणाली आधुनिक शाश्वत विपणनासाठी दिशादर्शक ठरू शकते. प्रस्तुत संशोधन निबंधात भारतीय ज्ञानप्रणालीची मूलतत्त्वे, शाश्वत विपणनाची संकल्पना, दोन्हींचा परस्पर संबंध आणि त्यातून विकसित होणारे शाश्वत विपणन मॉडेल यांचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

**सूचीबद्ध शब्द (Key Words):** भारतीय ज्ञानप्रणाली, सस्टेनेबल मार्केटिंग, टिकाऊ विकास, नैतिक व्यवसाय, पर्यावरणीय संतुलन, समाजकल्याण

**१. प्रस्तावना**

भारताची आधुनिक अर्थव्यवस्था स्पर्धा, नफा आणि बाजारपेठेतील विस्तार यांवर आधारित आहे. परंतु नफा जास्त मिळविण्याच्या  धडपडीमुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकी वापर होताना दिसत आहे पर्यावरणीय प्रदूषण वाढते आहे व ग्राहकांची दिशाभूल होऊन,  सामाजिक विषमता वाढली आहे. या सर्व कारणामुळेच शाश्वत विपणन विकसित झाले  या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना पुढे आली. त्याचाच एक भाग म्हणून शाश्वत विपणन विकसित झाले, जे दीर्घकालीन सामाजिक आणि पर्यावरणीय हित लक्षात घेऊन व्यवसाय चालवण्यावर भर देते.

भारतीय ज्ञानप्रणाली ही केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक परंपरा नसून जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये संतुलन आणि नैतिकतेचा आग्रह धरणारी समग्र दृष्टी आहे. प्राचीन ग्रंथ, उपनिषद, अर्थशास्त्र, योगशास्त्र, आयुर्वेद, ग्रामव्यवस्था आणि लोकपरंपरा यांमधून विकसित झालेली ही प्रणाली व्यवसाय आणि विपणनासाठीही मौल्यवान मार्गदर्शन करते.

**२. शाश्वत विपणनाची संकल्पना**

शाश्वत विपणन म्हणजे ग्राहकांच्या गरजा पूर्ण करताना पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचा विचार करून व्यवसाय करणे. पारंपरिक विपणनाचा उद्देश अल्पकालीन नफा वाढवणे हा असतो परंतु शाश्वत विपणनाचा उद्देश व्यवसाय दीर्घकाल टिकणे आणि सामाजिक उत्तरदायित्व राखणे हा असतो.

शाश्वत विपणनाचे तीन प्रमुख आधारस्तंभ पुढीलप्रमाणे आहेत.

- आर्थिक शाश्वतता – व्यवसायाची दीर्घकालीन नफा क्षमता आणि स्थैर्य.
- पर्यावरणीय शाश्वतता – संसाधनांचा जबाबदारीने वापर, प्रदूषण कमी करणे, पुनर्चक्रण.
- सामाजिक शाश्वतता – न्याय्य व्यवहार, कामगारांचे हक्क, ग्राहक संरक्षण.

या तिन्ही घटकांमध्ये संतुलन राखणे म्हणजेच शाश्वत विपणन.

**३. भारतीय ज्ञानप्रणालीची मूलतत्त्वे**

भारतीय ज्ञान प्रणाली ही समस्त मानवाच्या निसर्गाच्या तसेच संपूर्ण अस्तित्वाच्या कल्याणावर आधारित आहे. म्हणून याला मानवीय ज्ञान प्रणाली सुद्धा म्हणतात. ही एक विशाल व व्यापक प्रणाली आहे जी हजारो वर्षापासून विकसित झाली आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाचा विचार भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये करण्यात आलेला आहे. तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, कला, आरोग्य, चिकित्सा इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये ही ज्ञान प्रणाली व्यापलेली आहे.

भारतीय ज्ञान प्रणाली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान हस्तांतरित करण्याची एक पद्धती आहे. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद आणि उपवेद हे भारतीय ज्ञान व्यवस्थेचा पाया आहे. ही प्रणाली निरीक्षण, अनुभव, प्रयोग आणि सखोल विश्लेषणातून विकसित झाली आहे.

भारतीय ज्ञानप्रणाली जीवनाच्या चार पुरुषार्थांवर आधारित आहे.– धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. यामध्ये अर्थ (आर्थिक क्रिया) हा धर्माच्या चौकटीत राहून साध्य करायचा आहे. यामुळे नैतिक व्यवसायाचा विचार स्पष्ट होतो.

**३.१ धर्म (नैतिक कर्तव्य)**

धर्म म्हणजे योग्य आचरण आणि सामाजिक जबाबदारी. व्यवसाय करताना प्रामाणिकपणा, पारदर्शकता, इतरांशी वागणूक आणि न्याय यांचा अवलंब करणे हे धर्माचे तत्त्व आहे.

**३.२ अहिंसा आणि करुणा**

अहिंसा म्हणजे कोणालाही, विशेषतः निसर्गाला, हानी न पोहोचवणे व ग्राहकांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊन देणे. करुणा म्हणजे सर्व सजीवांबद्दल संवेदनशीलता असणे. आधुनिक हरित विपणन (Green Marketing) ही याच तत्त्वांची आधुनिक आवृत्ती मानता येईल.

**३.३ समत्व आणि संतुलन**

भारतीय तत्त्वज्ञान जीवनातील संतुलनावर भर देते. उत्पादन, उपभोग आणि वितरण यामध्ये विपणन कार्यामध्ये संतुलन राखणे ही शाश्वततेची पूर्वअट आहे.

३.४ अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांची उत्पत्ती होताना दिसते. या बहुराष्ट्रीय कंपन्या विपणन प्रक्रियेमध्ये स्थानिक समाजाचा विचार करून याचे आधुनिकतेमध्ये रूपांतर केले पाहिजे. वसुधैव कुटुंबकम्

"संपूर्ण पृथ्वी हे एक कुटुंब आहे" ही संकल्पना जागतिक सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देते. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्थानिक समाजाचा विचार करून व्यवसाय करणे ही याची आधुनिक रूपांतरे आहेत.

**४. भारतीय ज्ञानप्रणाली आणि शाश्वत विपणन यांचा परस्पर संबंध आहे.**

भारतीय तत्त्वज्ञान शाश्वत विपणनाला पुढील प्रकारे दिशा देते:

**४.१ नैतिक जाहिरात आणि पारदर्शकता**

आजच्या बाजारपेठेत अनेकदा ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आढळतात. भारतीय तत्त्वज्ञानातील 'सत्य' आणि 'धर्म' या मूल्यांनुसार जाहिरातीत वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे. पारदर्शक माहिती देणे ग्राहकांच्या विश्वासाला बळकटी देते.

**४.२ पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया**

अहिंसेच्या तत्त्वानुसार उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणाला हानी न पोहोचविणे किंवा कमी हानी पोहोचवणे अपेक्षित आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक घटकांचा वापर, पुनर्वापरयोग्य पॅकेजिंग हे उपाय भारतीय दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत.

**४.३ स्थानिक अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन**

ग्रामस्वराज्य आणि स्थानिक उत्पादनांची संकल्पना महात्मा गांधींनी मांडली. खेड्यांचा विकास म्हणजेच देशाचा विकास असे ते मानत.स्थानिक कारागीर, शेतकरी आणि लघुउद्योगांना विपणनात स्थान देणे म्हणजे सामाजिक शाश्वतता वाढवणे होय.

**४.४ मर्यादित उपभोग Moderate Consumption)**

आधुनिक काळामध्ये माणसाचे उत्पन्न वाढले व चैनीच्या वस्तू खरेदीचे प्रमाण ही वाढले. भारतीय संस्कृती संयम आणि मितव्ययितेला प्राधान्य देते. अति उपभोगाला प्रोत्साहन देणाऱ्या विपणनाऐवजी गरजेनुसार उपभोगाचा संदेश देणे शाश्वततेस पूरक आहे.

**५. भारतीय तत्त्वांवर आधारित शाश्वत विपणन मॉडेल**

भारतीय ज्ञानप्रणालीच्या आधारे पुढील चार टप्प्यांचे शाश्वत विपणन मॉडेल मांडता येईल.

**अ. नैतिक उत्पादन (Ethical Production)**

उत्पादनात नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे, कामगारांचे कल्याण व हीत जोपासणे, गुणवत्ता नियंत्रण करणे.

**ब. जबाबदार वितरण (Responsible Distribution)**

पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेचा वापर करणे किंवा निवड करणे, स्थानिक बाजारपेठांना प्राधान्य, ऊर्जा बचत. ऊर्जेची बचत करून सामाजिक जबाबदारी पार पाडणे सत्यनिष्ठ विचार भ्राह्मक दावे टाळणे

**क. सत्यनिष्ठ प्रचार (Truthful Promotion)**

भ्रामक दावे टाळणे, उत्पादनाचे फायदे-तोटे स्पष्ट करणे. प्रत्येक वस्तूंचे फायदे व तोटे हे असतातच ते ग्राहकापर्यंत पोहोचविणे. तसेच वस्तूंची व सेवांची योग्य व सत्य माहिती देणे.

**ड. सामाजिक पुनर्निवेश (Social Reinvestment)**

मनुष्य सामाजिक प्राणी असून समाजाप्रती त्याचे देणे लागते म्हणून नफ्याचा काही भाग समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण संरक्षणासाठी वापरणे. हे मॉडेल दीर्घकालीन ब्रँड निष्ठा निर्माण करण्यास मदत करते.

**६. आधुनिक संदर्भातील उदाहरणे**

आयुर्वेदिक आणि सेंद्रिय उत्पादने – नैसर्गिक घटकांचा वापर आणि पारंपरिक ज्ञानावर आधारित विपणन.

**नैसर्गिक घटकांचा वापर**

१. आयुर्वेदिक साबण व सौंदर्यप्रसाधने-घटक: नीम, तुळस, हळद, चंदन फायदे: त्वचेसाठी सुरक्षित, रसायनमुक्त विपणन दृष्टिकोन: "100% Natural", "Chemical Free" अशा घोषणांद्वारे हरित विपणन

२. खादी व हातमाग कापड घटक- नैसर्गिक कापूस, वनस्पती रंग फायदे: पर्यावरणपूरक, जैविक विघटनशील. विपणन दृष्टिकोन: स्वदेशी, ग्रामीण रोजगार, शाश्वत फॅशन

**निष्कर्ष** -वरील उदाहरणांवरून स्पष्ट होते की नैसर्गिक घटकांचा वापर केल्याने पर्यावरणाचे रक्षण होते

ग्राहकांचा विश्वास वाढतो.भारतीय ज्ञान परंपरेतील संतुलन व नैतिकता जपली जाते.शाश्वत विपणनाला चालना मिळते.

**पारंपारिक ज्ञानावर आधारित विपणन**

**१. खादी आणि ग्रामोद्योग**

- पारंपारिक आधार: स्वदेशी आंदोलन, हातमाग परंपरा
- विपणन दृष्टिकोन:"स्वदेशी", "हँडमेड", "इको-फ्रेंडली" अशा संकल्पना.
- ग्रामीण रोजगार व आत्मनिर्भरता यावर भर.
- नैसर्गिक कापूस व वनस्पती रंगांचा वापर.

**२. आयुर्वेदिक उत्पादने (उदा. हर्बल औषधे/सौंदर्यप्रसाधने)**

पारंपारिक आधार: आयुर्वेद शास्त्र, वनौषधी ज्ञान

विपणन दृष्टिकोन:-"प्राचीन आयुर्वेदिक सूत्रांवर आधारित",रसायनमुक्त, नैसर्गिक घटक,आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रचार

**निष्कर्ष**

पारंपारिक ज्ञानावर आधारित विपणन हे:ब्रँडला सांस्कृतिक ओळख देते,ग्राहकांमध्ये विश्वास व भावनिक नाते निर्माण करते.पर्यावरणपूरक व शाश्वत विकासाला चालना देते.ग्रामीण व स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देते

**हस्तकला आणि 'मेक इन इंडिया' उपक्रम**

स्थानिक कारीगरांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

**हरित ऊर्जा कंपन्या – सौर व पवन ऊर्जेवर आधारित उत्पादने.**

भारतीय ज्ञान परंपरेत सूर्य व वायू यांना जीवनदायी शक्ती मानले आहे. "सूर्योपासना" व "वायू तत्व" या संकल्पना आजच्या नवीकरणीय ऊर्जा (Renewable Energy) तत्त्वांशी सुसंगत आहेत. आधुनिक विपणनांत या ऊर्जेवर आधारित उत्पादने शाश्वत विकासासाठी महत्त्वाची ठरतात.

**१. सौरऊर्जेवर आधारित उत्पादने**

**उदाहरणे:** सोलर पॅनेल (घर व उद्योगासाठी) सोलर वॉटर हीटर सोलर स्ट्रीट लाईट सोलर चार्जर व उपकरणे.

**फायदे:** विजेची बचत प्रदूषण कमी दीर्घकालीन आर्थिक बचत ग्रामीण भागात ऊर्जा उपलब्धता

**विपणन दृष्टिकोन:**"Green Energy Solution सरकारी अनुदान व सबसिडी प्रचार

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश

**२. पवनऊर्जेवर आधारित उत्पादने**

**उदाहरणे:** वारा टर्बाईन (Wind Turbines) पवनऊर्जा प्रकल्प लघु पवनऊर्जा यंत्रे (घरगुती वापरासाठी)

**फायदे:** अक्षय ऊर्जा स्रोत कार्बन उत्सर्जन कमी शाश्वत औद्योगिक विकास

**विपणन दृष्टिकोन:** "Clean & Renewable Energy" पर्यावरणीय जबाबदारी CSR उपक्रमांशी जोडणी

**निष्कर्ष**

सौर व पवनऊर्जा आधारित उत्पादने:पर्यावरणपूरक व टिकाऊ विकासाला चालना देतात. भारतीय ज्ञान परंपरेतील निसर्गपूजनाशी सुसंगत आहेत. शाश्वत विपणनासाठी प्रभावी साधन ठरतात

ही उदाहरणे दर्शवितात की भारतीय मूल्ये आधुनिक व्यवसायात व्यवहार्य आहेत.

**७. आव्हाने आणि मर्यादा**

- भारतीय ज्ञानप्रणालीचा शाश्वत विपणनात उपयोग करताना काही अडचणी येऊ शकतात:
- जागतिक स्पर्धेमुळे कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर उत्पादनाची गरज असते.
- काही पारंपारिक वस्तू महागड्या व मिळविण्यास खर्चिक असतात.
- ग्राहकांची किंमत-आधारित निवड-पारंपारिक कच्च्या मालाच्या वापरामुळे वस्तूंची किंमत वाढते व ग्राहक स्वस्त व आधुनिक वस्तूंकडे धाव घेतात उदाहरणार्थ सिल्क उत्पादने.
- तांत्रिक आणि आर्थिक संसाधनांची मर्यादा
- पारंपरिक ज्ञानाचे आधुनिक संदर्भात पुनर्मूल्यांकन करण्याची आवश्यकता या आव्हानांवर मात करण्यासाठी शिक्षण, धोरणात्मक समर्थन आणि नवोन्मेष आवश्यक आहे.

८. शिफारसी

- व्यवसाय शिक्षणात भारतीय तत्त्वज्ञानाचा समावेश करणे.
- CSR धोरणांना अधिक प्रभावी आणि पारदर्शक बनवणे व त्यांचा समाजासाठी लाभ करून देणे.
- हरित तंत्रज्ञानासाठी सरकारी प्रोत्साहन देणे व ते प्रत्यक्षात उतरविणे.
- ग्राहकांमध्ये वस्तू विषयी व सेवांविषयी जागरूकता वाढवणे.
- स्थानिक उद्योगांना डिजिटल विपणनाचे प्रशिक्षण देणे. आधुनिक युग हे डिजिटल युग आहे व त्याचा प्रत्यक्ष वापर करणे

९. निष्कर्ष

भारतीय ज्ञानप्रणाली ही केवळ ऐतिहासिक वारसा नसून आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनासाठी उपयुक्त मार्गदर्शक आहे. धर्म, अहिंसा, समत्व, संयम आणि वसुधैव कुटुंबकम् यांसारखी मूल्ये शाश्वत विपणनाच्या तत्त्वांशी पूर्णतः सुसंगत आहेत. आज जागतिक संकटे उभी ठाकली आहेत. आजच्या जागतिक संकटांच्या पार्श्वभूमीवर व्यवसायाने केवळ नफ्याचा विचार न करता सामाजिक मुले पर्यावरणाचे संगोपन, नियंत्रण आणि पर्यावरणीय जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित शाश्वत विपणन मॉडेल व्यवसायाला दीर्घकालीन स्थैर्य वाढवितात, ग्राहकांचा विश्वास वृद्धिंगत करतात आणि सामाजिक स्वीकार्यता प्रदान करू शकते. त्यामुळे भारतीय मूल्यांचा पुनर्विचार करून त्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाशी जोडणे ही काळाची गरज आहे. यामुळे आर्थिक विकासाबरोबरच पर्यावरणीय संतुलन राखले जाईल आणि सामाजिक न्याय साध्य होईल — आणि हाच खरा शाश्वत विकासाचा मार्ग आहे.

**संदर्भ सूची (References)**


- शर्मा, अनिल (2021). भारतीय तत्त्वज्ञान व पर्यावरणीय व्यवस्थापन. पुणे: विद्यापीठ प्रकाशन.
- देशपांडे, रीता (2020). शाश्वत विपणन: संकल्पना आणि धोरणे. मुंबई: व्यवस्थापन प्रकाशन.
- जोशी, सुशील (2019). भारतीय अर्थशास्त्र आणि विपणन तत्त्वे. नागपूर: अर्थशास्त्र अभ्यास केंद्र.
- कौटिल्य (2022). अर्थशास्त्र (कौटिल्य नीति). संपादित आवृत्ती.
- खुराणा, सीमा (2018). "Green Marketing in India: A Conceptual Study", Journal of Sustainable Business Practices.
- पाटील, अभिनव (2023). आयुर्वेद आणि शाश्वत जीवनशैली. अहमदनगर: आयुर्वेद संशोधन मंडळ.